# मध्य परिमंडळ ०२

## प्रेस नोट

**दिनांक :- ०१/०७/२०२६**

दिनांक २२/०६/२०२६ रोजी सकाळी ०९.४५ वा. फिर्यादी नामे कु. अनामिका रवी अंगारी, वय २५ वर्षे, या करीरोड स्टेशनकडे जात असतांना वन अविघ्न बिल्डिंगसमोर, करी रोड, चिंचपोकळी, मुंबई ४०००१२ या ठिकाणी दोन अनोळखी इसमांनी मोटार सायकलवरून फिर्यादी यांच्या गळयातील अ.कि.रू. १,००,०००/- एक १० ग्रॅम वजन असलेली गोल-गोल कडया असलेली व त्यामध्ये हार्ट आकाराचे लॉकेट असलेली सोन्याची चैन खेचून पळून गेले. सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून काळाचौकी पोलीस ठाणेस गु.र.क्र. २३४/२०२६ कलम ३०९(४), ३०४, ३१७(४) (५), ३(५) भा.न्या.सं.२०२३. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या तपसाकरिता मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली चार शोध पथके तयार करण्यात आली. सदर पथकांनी गुन्हयाच्या घटनास्थळावरील तसेच आजुबाजुच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे व तांत्रिक कौशल्याचा वापर करून आरोपी नामे मानव सुनिल धोटे वय १९ वर्षे, धंदा-नाही, पत्ता- रुम नं.१०२, बिल्डींग नं १५, नटवर पार्क कंपाऊंड, म्हाडा शिवाजी नगर पोलीस ठाणे मागे, शिवाजी नगर, गोवंडी, मुंबई ४३ व **विधी संघर्षगस्त बालक** यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

आरोपी नामे मानव सुनिल धोटे वय १९ वर्षे यांच्याकडून सदर गुन्हयात वापरलेली एमएच ०1 डीजी ४८७२ यामाहा कंपनीची लाल व काळया रंगाची आर १५ अं. कि. रू. ५०,०००/- ही मोटार सायकल जप्त करण्यात आलेली आहे.

सदरची कामगीरी मा.पोलीस आयुक्त, श्री देवेन भारती, मा.पोलीस सह आयुक्त, (कायदा व सुव्यवस्था) श्री मनोजकुमार शर्मा, मा.पोलीस सह आयुक्त,(गुन्हे) श्री अनिल कुंभारे , मा. अप्पर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, श्री विक्रम देशमाने, पोलीस उप आयुक्त, मध्य परिमंडळ ०२, श्री अनुराग जैन, सहाय्यक पोलीस आयुक्त, भोईवाडा विभाग, श्री घनश्याम पलंगे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काळाचौकी पोलीस ठाण, श्री आदीनाथ गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) संदीप माने, स.पो.नि. अमित भोसले, स.पो.नि. हसन मुलाणी,पो.उप.नि. धनंजय व्यवहारे, पो.उप. नि. अविनाश वाघमारे, पो.उप.नि. शितल माने, पोह ००९२४/चन्ने, पो.ह. ०९०१५८/गोपाळ चव्हाण, पोशि १११३९६/प्रशांत पवार, पोशि १११६८८/नायकवाडी, पो.शि.१३०९३३/सोनवणे, पोशि १४०७५१/ खांडेकर, पोशि १५०९९६/चंद्रकात कुभार,पो.शि. १११३१५/कोळेकर, पो.शि. १५१०५०/आंग्रे, मपोशि १३०९५१/तेजस्वीनी गवारी यांनी उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे.